## राष्ट्रीय हिवताप निर्मुलन कार्यक्रम

**१) हिवताप लागण वार्षिक प्रमाण**

( Annual Parasite incidence ) = $\dfrac{\text{हिवतापाचे एकूण असलेले रुग्ण}}{\text{मध्यवार्षिक लोकसंख्या}} \times १०००$

**२) वार्षिक रक्त नमुना तपासणी प्रमाण**

( Annual blood examination RAte ) = $\dfrac{\text{संभावित वर्षात तपासलेले एकूण रक्त नमुने}}{\text{मध्य वार्षिक लोकसंख्या}} \times १००$

**३) दुषित रक्त नमुन्यांचे प्रमाण**

( Slide +ve rate ) = $\dfrac{\text{एकूण आढळलेले हिवताप दुषित रक्तनमुने}}{\text{एकूण तपासलेले रक्तनमुने}} \times १००$

**४) फॅलसिपेरम प्रमाण**

( Slide Falciparum Rate ) = $\dfrac{\text{फॅलसिपेरम प्रकार  हिवतापाचे रुग्ण आढळलेले}}{\text{तपासलेले रक्त नमुने}} \times १००$

**हिवतापाचे रुग्ण प्रमाणे अे.पी.आय. Anual Paracits Intidance**

= $\dfrac{\text{हिवतापाचे एकुण रुग्ण}}{\text{मध्यवार्षीक लोकसंख्या}} \times 100$

१. किमोप्रोफीकॅवसीरा ट्रिटमेंट :-
२. १६ आठवडे पुर्ण झाल्यानंतर दर आठवडयाला ३०० एम.जी. क्लोरोक्वीन डीलेव्हरी होईपर्यंत दयाव्यात.
३. अे.एन.सी. असुन ब्लड स्लाईड पॉझेटीव्ह असल्यास दर महिन्याला ४ गोळया दयाव्यात.
४. प्रसुतीनंतर ४० दिवस झाल्यानंतर आर.टी. दयावी.

### हिवतापाची साथ (उद्रेक) केव्हा म्हणतात.

१. मागील ३ महिन्यात एकही केस निघालेली नसल्यास आणि या महिन्यात पी. पी. एकजरी केस निघाल्यास.
२. तापाने एकजरी मृत्यु झाला असल्यास.
३. मागील वर्षापेक्षा या कालावधीत जास्त रुग्ण असल्यास.
४. एकुण पॉझेटीव्ह केसेसच्या ३ टक्के पी.पी. केसेस असल्यास.
५. १००० लोकसंख्येस एका गावात ५ पेक्षा जास्त पॉझेटीव केसेस असल्यास

**उद्रेक झाल्यास :-** सव्हेक्षण करणे, ब्लड सीमर घेणे, आर.टी देणे, सी.आर.टी. देणे, गप्पी मासे  सोडणे, शोषखड्डे तयार  करणे.

## किटक शास्त्रीय निर्देशांक

**१. डांस घनता :- (Adwlt Density)**

$$= \frac{\text{पकडलेले रोग वाहक डास}}{\text{खर्च केलेला वेळ (तांसात)}}$$

**टिपः-** डांस घनता प्रती माणसी प्रती तास गणना करण्यात येते.

**.अळी घनता :- (Larval Density)**

$$= \frac{\text{आढळलेल्या अळयांची संख्या}}{\text{घेतलेल्या डिपची संख्या}}$$

**टिप** :- अळी घनता प्रति डिप गणना करण्यात येते डेंग्यु करीता तडीस डांस अळी सर्व्हेक्षण निर्देशांक

**१. गृह निर्देशांक (House Index)**

$$= \frac{\text{डांस अळी आढळलेल्यां घरांची संख्या}}{\text{तपासलेले एकुण घरे}} \times १००$$

**२. भांडी निर्देशांक (Container Index)**

$$= \frac{\text{डांस अळी आढळलेल्यां कंटेनरची संख्या}}{\text{तपासलेले कंटेनरची संख्या}} \times १००$$

**३. ब्राटयु निर्देशांक**

$$= \frac{\text{डांस अळी आढळलेल्यां कंटेनरी संख्या}}{\text{तपासलेले एकुण घरे}} \times १००$$

| **इंडेक्स** | **हाय रिक्स** | **कमी रिक्स** |
|---|---|---|
| ब्राटयु निर्देशांक | > ५० | < ५ |
| भांडी निर्देशांक | > १० | < १ |
| गृह निर्देशांक | > १५ | < १ |

**टिपः** दैनंदिन किटकशास्त्रीय सर्व्हेक्षणामध्ये हाऊस इंडेक्स १० टक्केपेक्षा जास्त किंवा ब्राटयु इंडेक्स ५० टक्केपेक्षा जास्त आढळुन आल्यास ते गांव डेग्यु / चिकुनगुनिया रोगासाठी संवेदनशिल समजावे व तात्काळ उपाययोजना राबवाव्यात.

**टेमीफॉस (ॲबेट):**

. द्रावण बनविणेः ९८० मीली पाण्यामध्ये २० मीली टेमीफॉस टाकावे म्हणजे १ टक्के टेमीफॉसचे द्रावण तयार होते.

| अ क्र | पाण्याचा साठा | आवश्यक १ टक्के टेमीफोसचे द्रावण |
|---|---|---|
| १ | १० लिटर | १ मीली |
| २ | २० लिटर | २ मीली |
| ३ | १०० लिटर | १० मीली |

## कंटेनरर्स मधील पाणी साठा ठरविण्याची पध्दत

प्रथम पाणी साठयांच्या कंटेनरर्सचे गणितातील सुत्रानुसार घनफळ काढावे.

उदा. हौदाची लांबी - ३ फुट, हौदाची रुंदी - २ फुट

हौदातील पाण्याची उंची - २ फुट

हौदाचे घनफळ - लांबी X रुंदी X उंची = घनफुट

उदा ३ X 2 X 2 ची = 12 घनफुट

- १ घनफुटा घनफळाचे क्षेत्रामध्ये २८ लिटर पाणी असते
- त्यानुसार १२ घनफुट असलेल्या कटेनर मध्ये १२ X 28 = 236 लिटर पाणी असेल.
- १० लिटर पाण्यासाटी तयार केलेल्या १ टक्का टेमीफॉस मधील १ मी ली लिटर टाकावे. या प्रमाणे ३३६ लिटर साठी ३३६ /१० ३३.६ मि ली १ टक्के टेमीफॉस लागेल.

टेमीफॉस १ टक्का इ सी वापरण्यासाठी सर्वसाधारण सुत्र गोलाकार कंटेनर

$$= \frac{\text{लांबी X रुंदी X कंटेनरमधील पाण्याची उंची X 28}}{१०}$$

**टिप :**- अ) पिण्याच्या पाण्यामध्ये टेमीफॉसचा वापर करु नये

ब ) १ टक्के द्रावणाचा वापर जे पाणी साठे आठवडयाला रिकामे करता येत नाही,

  - अश्या पाणी साठयामध्ये पंधरवाडयाला एकदा वापर करावा.

- १ टक्के टेमीफॉस चे तयार केलेले मित्रण / द्रावण त्याच दिवशी वापरणे आवश्यक आहे.
- पुरवठा केलेल्या ५० टक्के इ सी चा कोणत्याही परिस्थीतीत थेट वापर करु नये.